महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक – ३८०६ दिनांक :- १३ सप्टेंबर, २०२२

<u>प्रसिद्धीपत्रक</u>

म्हाडा पुणे मंडळ सोडत ऑगस्ट-२०२२

# २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील यशस्वी अर्जदारांच्या पात्रता निश्चितीसाठी विशेष शिबिर

दोन दिवसात ८५० विजेत्या अर्जदारांना देकार पत्र प्रदान ; शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई, दि. १३ सप्टेंबर, २०२२ :- पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) सदनिका विक्रीकरीता नुकत्याच जाहीर केलेल्या संगणकीय सोडतीतील २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील २०८८ यशस्वी अर्जदारांच्या पात्रता निश्चितीकरिता १२ ते १५ सप्टेंबर या कालावधीत पात्रता निश्चिती शिबिर आयोजित करण्यात आले असून दोन दिवसांमध्ये ८५० विजेत्या पात्र अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र प्रदान करण्यात आले आहे.

पुणे मंडळाच्या कार्यालयात आयोजित विशेष पात्रता निश्चिती शिबिरास यशस्वी अर्जदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून शिबिराच्या पहिल्याच दिवशी ५३७ व दुसऱ्या दिवशी ३१३ विजेत्या अर्जदारांच्या कागदपत्रांची तपासणी करून त्यांची पात्रता निश्चिती करण्यात आली आहे. गेल्या दोन दिवसांत सुमारे ८५० अर्जदारांना तात्पुरते देकार पत्र (Provisional Offer Letter) मंडळातर्फे प्रदान करण्यात आले आहे. एकाच दिवसात पात्रता निश्चिती व तात्पुरते देकार पत्र या दोन्ही गोष्टी होत असल्याने तसेच वेळेची बचत होत असून विजेत्या अर्जदारांकडून मंडळातील कर्मचाऱ्यांचे व विशेष शिबिराचे कौतुक करण्यात येत आहे.

पुणे मंडळातर्फे १८ ऑगस्ट, २०२२ रोजी पुणे, पिंपरी चिंचवडसह, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील ५ हजार २११ सदनिकांची सोडत काढण्यात आली होती. या सोडतीत २० टक्के सर्वसमावेशक योजनेत पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत ५७५ सदनिका तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत १५१३ अशा एकूण २०८८ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध होत्या.

२० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील विजेत्या अर्जदारांची पात्रता म्हाडा स्तरावरून सोडत झाल्यानंतर ६ महिन्यांच्या आत निश्चित करणे आवश्यक आहे. सोडतीनंतर पात्रता निश्चिती प्रक्रियेतील विलंब टाळण्यासाठी पुणे मंडळातर्फे पात्रता निश्चिती शिबिराची संकल्पना राबविली जात असल्याचे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री नितीन माने यांनी सांगितले.

सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना मंडळातर्फे ईमेल द्वारे सूचनापत्र व त्यासोबत पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी व विहित नमुने पाठविले जातात. यशस्वी अर्जदार सदर पात्रता शिबिराच्या कालावधीत विहित नमुन्यातील कागदपत्रे घेऊन शिबिरात सहभागी होत आहेत. या शिबिरांतर्गत म्हाडा कर्मचारी यशस्वी अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी तात्काळ करत असून त्यांची पात्रता निश्चिती ठरवत आहेत व त्यानंतर त्यांना याच शिबिरात तात्पुरते देकार पत्र देखील प्रदान करण्यात येत आहे, अशी माहिती श्री. माने यांनी दिली. तसेच ते पुढे म्हणाले की, अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास अर्जदारांना ठराविक कालावधी देऊन कागदपत्रे पुनः सादर करण्याची सवलत देण्यात येत आहे. वेळेची बचत होत असल्याने यशस्वी अर्जदारांनी या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले. २० टक्के

सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील विजेत्या अर्जदारांनी या शिबिरात सहभागी होऊन प्रतिसाद देण्याचे आवाहन देखील श्री. माने यांनी केले आहे.

(सही-/)
(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण



